-: प्रेसनोट दिनांक- १७/०३/२०२० :-

साताप्पा शंकर कळंत्रे,वय-४६,लिपीक, एम.ए.जी.विभाग,(दंडाधिकारी शाखा)तहसिलदार कार्यालय, भुदरगड, मुळ रा.गुरव गल्ली, मोरेवाडी,ता.भुदरगड, सध्या रा. डॉ.डी.वाय.पाटील कॉलनी, मौनी विद्यापिठ परिसर, गारगोटी,ता. भुदरगड यांनी लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारलेबाबत.........

---

यातील तक्रारदार हे कूर गावचे रहिवासी आहेत. तक्रारदार यांची व त्यांचे भाउबंद यांची कूर गावचे हद्दीत शेती असून शेताचे हद्दीवरुन त्यांचेत वाद आहे. दिनांक २५/०६/२०१९ रोजी तक्रारदार व त्यांचे भाउबंद यांचेत वाद झाला होता. त्याबाबत तक्रारदार यांचे भाउबंद यांनी भुदरगड पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती. त्याबाबत भुदरगड पोलीस ठाणे येथे तक्रारदार यांचेविरुध्द अदखलपात्र गु.र.नं. ३५०/२०१९, भा.दं.वि.सं.कलम- ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद आहे. त्यावरुन भुदरगड पोलीस ठाणेकडून तक्रारदार यांचेविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई अंतर्गत कार्यकारी दंडाधिकारी, भुदरगड यांचेकडे सी.आर.पी. सी.कलम १०७ प्रमाणे चॅप्टर केस पाठविणेत आली होती. सदर चॅप्टर केसचे निवासी नायब तहसिलदार, भुदरगड यांचेकडे कामकाज सुरु असून साताप्पा शंकर कळंत्रे,लिपीक, एम.ए.जी.विभाग,(दंडाधिकारी कामकाज) तहसिलदार कार्यालय, भुदरगड हे चॅप्टर केसची कागदपत्रे हाताळत आहेत. सदर चॅप्टर केस बंद करणेसाठी लिपीक साताप्पा शंकर कळंत्रे यांनी तक्रारदार यांचेकडे रु.१,०००/- लाच मागणी केलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार अर्ज दिला होता.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक १७/०३/२०२० रोजी तहसिलदार कार्यालय, भुदरगड येथे लिपीक कळंत्रे यांचे लाच मागणीबाबत शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये लिपीक कळंत्रे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचेविरुध्द असलेली चॅप्टर केस बंद करणेसाठी रुपये १,०००/- लाचेची मागणी केली. तसेच तक्रारदार यांची चॅप्टर केस आज रोजी बंद केलेबाबत त्यांचेकडून लिपिक कळंत्रे यांनी रु.१,०००/- लाच रक्कम तहसिलदार कार्यालय, भुदरगड येथे स्विकारली असता, त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत भुदरगड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई मा.श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व मा.श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोहेकॉ मनोज खोत, पोना शरद पोरे, पोना नवनाथ कदम, पोकॉ मयुर देसाई, चालक पोहेकॉ सुरज अपराध, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१. मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२. मा.पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे परिक्षेत्र,पुणे दुरध्वनी कमांकः-०२०/२६१२२१३४, ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३. श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.
४. हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४,
५. व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

| | | |
|---|---|---|
| १४५० | १०७० | ० |
| ६४० | ० | ० |
| ३६३९ | १०७० | ११००३८२ |